**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९-००००९४-२०१७**

**नियमित दिवाणी दावा क्र. ३४/२०१७**

**निशाणी क्र. ६९ वरील आदेश**

प्रस्ततुचा अर्ज वादी याने प्रतिवादी क्र.२ यांचे वारस अभिलेखावर आणणेस झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून तशी दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीने आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, सदरील दावा वादीने प्रतिवादी विरुध्द वाटपासाठी दाखल केला आहे. तरी सदर दाव्यातील प्रतिवादी नं.२ श्री. विठोबा बापू सारंग हे ता.०९/०२/२०२४ रोजी मयत झाले असल्याबाबत नि.क्र.६८ येथे पुरशीस देवून मे. न्यायालयास कळविले आहे. त्यावेळी सदर प्रतिवादीच्या मृत्युबाबत वादीस माहिती समजली. तसेच सदरचे वारस हे मुदतीत दाखल करावयाचे असतात याचे ज्ञात नसल्यामुळे सदर प्रतिवादीचे वारस मुदतीत दाखल करता आलेले नाहीत. त्यामुळे वादीचा दावा सदर प्रतिवादी विरुध्द अबेट झाला आहे. तरी सदर प्रतिवादीचे वारस आज रोजी दाखल करत आहेत. तरी सदर प्रतिवादी विरुध्द झालेली अबेटमेंट रद्द करण्यात येवून वर नमुद प्रतिवादीचे वारस दाखल करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादी क्र.३ यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार वादीने कोणतेही संयुक्तीक कारण दिले नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, प्रतिवादी क्र.३ तर्फे नि.क्र.६८ येथे पुरशीस दाखल करुन प्रतिवादी क्र.२ हे मयत आहेत असे कथन केले आहे. प्रस्तुतचा अर्ज वादीने उशिराने दाखल केलेला आहे. वादीचे विलंबाबाबतचे नमुद कारण स्विकारार्ह नाही. प्रस्तुतचा दावा हा वाटपाकरिता दाखल केलेला आहे. मात्र न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना व वादी, प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपुर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुत अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश

पारीत करीत आहे.

**- आदेश -**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रतिवादींना रक्कम रुपये १००/- देण्याच्या अटीवर मयत प्रतिवादी क्र.२ यांच्या विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

NANDA BAPUSO GHATAGE
Digitally signed by NANDA BAPUSO GHATAGE
Date: 2024.09.27 15:26:15 +0530

( श्रीमती एन.बी.घाटगे )

दिनांकः २५/०९/२०२४ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.